दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २२१ । गुरूवार २८ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



बकरी ईद निमित्त मुस्लिम बांधवांच्या वतीने कोठला येथील ईदगाह मैदान येथे सामूहिक नमाज पठण करण्यात आले (फोटो - राजु खरपुडे, नगर)

## शहरात बकरी ईद उत्साहात साजरी; शांतता व राष्ट्रीय एकात्मतेची प्रार्थना

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद (ईद उल अज्हा) गुरुवारी (दि.२८ मे) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदी मधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त प्रमुख नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले. मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटी-गाठी घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर कुर्बानी करताना इतर धर्मियांना त्रास होणार नाही आणि गोवंश जनावरांची कुर्बानी न करण्याच्या समाजबांधवांना विशेष सूचना करण्यात आल्या.

पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारी म्हणून ईदगाह मैदानसह शहरातील चौका-चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कब्रस्तान व दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. बकरी ईद निमित्त तीन दिवस म्हणजे गुरुवार पासून शनिवार पर्यंत घरोघरी कुर्बानी केली जाणार आहे. सोशल मीडियावर देखील बकरी ईदच्या शुभेच्छांचा पाऊस पडला होता.

# सरकारी मेडिकल कॉलेज कापूरवाडी येथे होणार

### २५ एकर जागा निश्चित । खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्याच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया'साठी नगर तालुक्यातील कापूरवाडी येथे २५ एकर जागा निश्चित करण्यात आली असून, जिल्ह्याच्या पहिल्या सरकारी मेडिकल कॉलेजचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून महाविद्यालयासाठी ४४८ पदांची निर्मितीही मंजूर केली आहे.

जिल्ह्यात सरकारी मेडिकल कॉलेज व्हावे, यासाठी खासदार डॉ. निलेश लंके गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत होते. दिल्ली ते मुंबई विविध स्तरांवर बैठका घेऊन त्यांनी जिल्ह्याची आवश्यकता शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्यासमोरही त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्याची परिस्थिती मांडत मेडिकल कॉलेजची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर राज्य शासनाने प्रकल्पाला गती देत आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतले आहेत.

महाविद्यालयासाठी सुरुवातीला नालेगाव, अरणगाव आणि कापूरवाडी या ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर सर्व निकषांचा विचार करून कापूरवाडी येथील २५ एकर जागा अंतिम करण्यात आली आहे. या ठिकाणी भविष्यात अत्याधुनिक सुविधा असलेले मेडिकल कॉलेज, संलग्न रुग्णालय, विद्यार्थी वसतिगृह आणि संशोधन सुविधा उभारल्या जाणार आहेत.

चालू शैक्षणिक वर्षापासून १०० एमबीबीएस जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याची शक्यता आहे. नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयाचे तात्पुरते कामकाज जिल्हा आयुष रुग्णालयातून ■ पान ४ वर

## पाथर्डी मनसेच्या पदाधिकारी नियुक्त्या जाहीर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पाथर्डी –** तालुक्यातील मनसे पदाधिकारी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशान्वये व संपर्क अध्यक्ष नयन कदम साहेब यांच्या सूचनेनुसार उपजिल्हाध्यक्षपदी मोहरी येथील देविदास हंडाळ, उपतालुकाध्यक्षपदी सोमठाणे येथील रामेश्वर काकडे, आल्हणवाडी येथील विनोद गव्हाणे, शिरसाटवाडी येथील एकनाथ सानप यांची निवड मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी नियुक्तीपत्र देत केली.

तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संघटन बळकट करून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका लढवण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी दिल्या.

तालुक्यात विरोधी पक्षच उरला नसून सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे परंतु मनसे सक्षम पर्याय म्हणून जनतेसमोर उभा राहणार असून येत्या काळात ग्रामपंचायती पासून सर्व निवडणुका संघटना बांधणी करून लढणार असल्याचा निर्धार पालवे यांनी व्यक्त केला.

तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे पक्षात स्वागत करत ■ पान ४ वर

# नगर-मनमाड रस्त्यावरील मसाज पार्लरवर छापा

### चार पीडित महिलांची सुटका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयू) शहरातील नगर-मनमाड रस्त्यावरील ॲक्युम मसाज पार्लर या ठिकाणी स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाच्या अड्ड्यावर छापा टाकून कारवाई केली. या प्रकरणी चालकासह चारजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघांना अटक करण्यात आली आहे.

संतोष गणेश बघे (रा. संभाजीनगर), अनिकेत अशोक बचाटे (वय २७ वर्षे रा. जिनती, कुंभारगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर ह. रा. ॲक्यूम स्पा सेंटर / मसाज पार्लर, नगर-मनमाड रोड, नगर), तसेच ग्राहक काळुराम भीमा समिंदर (वय २८ वर्ष, रा. मांडवगण फराटा, शिरुर, जि. पुणे) व सजन सहदेवन (वय ४५ वर्षे रा. वेल्लूर पोस्ट पालका, राज्य केरळ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून, संतोष बघे हा फरार आहे. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली आहे.


दिनांक २७ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

**सहा महिन्यांत दुसरी कारवाई**

**ॲक्यूम स्पा सेंटर हे वेश्या व्यवसायासाठी कुप्रसिद्ध ठिकाण बनले असून, सहा महिन्यांपूर्वी डिसेंबर २०२५ मध्ये या ठिकाणी छापा टाकून व्यवस्थापक अनिकेत बचाटे याच्यासह दोघांवर गुन्हा दाखल केला होता. आता पुन्हा या ठिकाणी छाप्यात व्यवस्थापक अनिकेत बचाटे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. त्यामुळे हे स्पा सेंटर कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

नगर-मनमाड रस्त्यावर अँक्यूम स्पा सेंटरमध्ये देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती तोफखान्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांना मिळाली. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य व तोफखान्याच्या सपोनि कल्पना चव्हाण, उपनिरीक्षक तुषार धाकराव (नेमणूक नियंत्रण कक्ष) यांच्या पथकाने कारवाईची योजना आखली. ■ पान ४ वर

## उन्हाळ्यात बाहेर झोपलेल्या कुटूंबाच्या घरात चोरी मुद्देमाल लंपास



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**कोपरगाव –** सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने ग्रामीण भागासह अनेक सर्वसामान्य कुटुंबांमध्ये रात्रीच्या वेळी घराबाहेर अंगणात, पोर्चमध्ये किंवा मोकळ्या जागेत झोपण्याचे प्रमाण वाढले आहे. उकाड्यामुळे घराऐवजी बाहेर झोपणे अनेकांसाठी गरज बनली असली तरी अशावेळी घराच्या सुरक्षेकडे होणारे दुर्लक्ष चोरट्यांसाठी संधी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे. अशाच प्रकारची धक्कादायक घटना कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख येथे घडली असून रात्री संपूर्ण कुटुंब घराबाहेर झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून दागिने, मोबाईल व रोख रक्कम असा सुमारे ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संदिप वसंतराव जाधव (वय ४२, व्यवसायशेती, रा. माहेगाव देशमुख) हे कुटुंबासह वास्तव्यास ■ पान ४ वर

# पुण्यश्लोक अहिल्या देवींच्या कर्तृत्वाचा, विकासाचा अंगीकार करून त्यांची गरिमा जपण्याची गरज

### शहराच्या ५३६ व्या स्थापना दिनानिमित्त जयंत येलुलकर यांचे प्रतिपादन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव आपल्या शहराला आहे ही अभिमानाची, शहराच्या गौरवाची गोष्ट असून या नावाची गरिमा जपण्यासाठी अहिल्यादेवींनी राज्य कारभार करताना रयतेच्या कल्याणासाठी आपले योगदान दिले हाच आदर्श जपत शहराच्या सर्वांगीण विकासात भर पडावी, हे राजधानीचे शहर भविष्यात विकासाच्या बाबतीत राज्याचे मानबिंदू ठरावे असे प्रतिपादन रसिक ग्रुपचे अध्यक्ष व माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केले.

ऐतिहासिक अहिल्या नगर शहराच्या ५३६ वा स्थापना दिनानिमित्त ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चोंडी येथे जन्म झाला. होळकरांच्या इंदोर संस्थानचा राज्यकारभार पुण्यश्लोक अहिल्या देवींनी आदर्शरित्या साभाळला.



सामान्य जनतेसाठी अहिल्यादेवींनी देशात विविध ठिकाणी धर्मशाळा बांधल्या.मंदिरे बांधली,मंदिरांचा जीर्णोद्धार केला, नद्या स्वच्छ करीत त्या रुंद केल्या,घाट, बंधारे बांधले, रस्ते निर्माण केले व खऱ्या अर्थाने रयतेच्या सुखासाठी कार्य करतांना देशात प्रेरणा निर्माण केली स्त्रियांच्या हितासाठी विविध निर्णय घेताना त्यांच्या सुखदुःखाकडे लक्ष दिले ही आपल्यासाठी गौरवाची बाब आहे.

आज जिल्ह्याला त्याचं नाव आहे, त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार येथील प्रमुख राजकीय धुरिणांनी या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास केला तर देशात आपल्या जिल्ह्याचे नाव कौतुकाने घेतले जाईल व अहिल्या नावाची गरिमा खऱ्या अर्थाने जपली जाईल. तरच अहिल्यानगर नाव सार्थकी लागेल. आपल्या जिल्ह्यातील राजकीय नेत्यांची नक्कीच क्षमता आहे की ते विकासाच्या बाबतीत जिल्ह्याचे नाव देश पातळीवर घेऊन जाऊ शकतात. एकेकाळी होळकरांचे प्रमुख संस्थान असलेले इंदोर शहर स्वच्छतेच्या बाबतीत गेल्या काही वर्षांपासून देशात प्रथम क्रमांकावर आहे. देश परदेशातील पर्यटक या शहराच्या विकास, स्वच्छतेच्या बाबतीत भरभरून बोलतात. त्याचप्रमाणे अहिल्यादेवींचे हे शहर समृद्ध व्हावे.इथली ऐतिहासिक सीना नदी आज अतिशय वाईट स्थितीत आहे. एकेकाळी आपल्या रुंद पात्राने दुथडी भरून वाहणाऱ्या या पवित्र नदीचे अक्षरशः गटारात रूपांतर झाले असून पात्राचे रुंदीकरण करून ■ पान ४ वर

# शहारात ''चंगेडिया आऊटडोअर''च्या फ्लेक्स होल्डिंगचा काळाबाजार?

### चौकशी करा; अन्यथा महापालिकेसमोर आंदोलनाचा इशारा । विश्व मानवाधिकार परिषदेचा आयुक्तांना घेरावाचा इशारा; आदेश चंगेडिया यांच्यावर गंभीर आरोप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या फ्लेक्स होल्डिंग () प्रकरणावरून आता मोठा वाद निर्माण झाला असून, ''चंगेडिया आऊटडोअर'' आणि त्यांचे प्रोप्रायटर आदेश चंगेडिया यांच्या विरोधात चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. विश्व मानवाधिकार परिषदेच्या वतीने महापालिका आयुक्तांना निवेदन देत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

परिषदेकडून करण्यात आलेल्या आरोपांनुसार, शहरातील अनेक शासकीय तसेच खासगी इमारतींवर फ्लेक्स होल्डिंगसाठी मोठ्या प्रमाणात अँगल बसविण्यात आले आहेत. मात्र, या सर्व होल्डिंगसाठी महानगरपालिकेकडून अधिकृत परवानगी घेण्यात आली आहे का? संबंधित इमारतींचे कम्प्लेशन प्रमाणपत्र आहे का? तसेच स्ट्रक्चर ऑडिट



करण्यात आले आहे का? याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. याशिवाय ''चंगेडिया आऊटडोअर''मार्फत महानगरपालिकेला नेमका किती महसूल मिळतो, याचा तपशील सार्वजनिक करण्यात यावा, अशीही ठाम मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, प्रेमदान चौकातील नोबेल हॉस्पिटलजवळ श्री. कालिका डोअर्सच्या वरती विनापरवाना फ्लेक्स होल्डिंग लावण्यात आल्याचा थेट आरोप विश्व मानवाधिकार परिषदेकडून करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषिजी हॉस्पिटल येथे मूत्रपिंडाच्या मोठ्या गाठीवर दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया



अहिल्यानगर- येथील युरोलॉजी विभागामध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या मूत्रपिंडाच्या मोठ्या गाठीवर यशस्वी लॅप्रोस्कोपिक रॅडिकल नेफ्रेक्टॉमी करण्यात आली. रुग्णाच्या मूत्रपिंडाच्या वरच्या भागात सुमारे १० ८ ८ सें.मी. आकाराची मोठी गाठ होती. ही गाठ यकृत (लिव्हर), ओमेंटम आणि डायफ्रामला चिकटलेली असल्यामुळे शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक मानली जात होती. ही अवघड शस्त्रक्रिया डॉ. अमेय सांगळे आणि डॉ. अजित दरंदले यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. रूप क्षीरसागर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपिक पद्धतीने) संपूर्ण मूत्रपिंड आणि गाठ सुरक्षितपणे काढण्यात आली. मोठ्या चिराऐवजी लहान छिद्रांद्वारे करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला कमी वेदना, कमी रक्तस्त्राव आणि जलद पुनर्वसनाचा फायदा झाला. विशेष म्हणजे, शस्त्रक्रियेनंतर कोणतीही गुंतागुंत न होता रुग्णाला अवघ्या तिसऱ्या दिवशी सुखरूप घरी सोडण्यात आले.रुग्णालयातील युरोलॉजी विभाग अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असून येथे एंडोयुरोलॉजी व मिनिमली इन्वेसिव्ह शस्त्रक्रिया (दुर्बिणीद्वारे) नियमितपणे केल्या जातात. किडनी स्टोन, प्रोस्टेट, मूत्रमार्गातील अडथळे तसेच मूत्रपिंडाच्या कर्करोगावर दुर्बिणीद्वारे आधुनिक उपचार उपलब्ध असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.डॉक्टरांच्या मते, आधुनिक लॅप्रोस्कोपिक तंत्रज्ञानामुळे मोठ्या व गुंतागुंतीच्या मूत्रपिंडाच्या गाठींवरही सुरक्षित आणि परिणामकारक उपचार शक्य होत असून, वेळेवर निदान आणि तज्ज्ञ उपचार घेतल्यास रुग्ण लवकर बरे होऊ शकतात.

### निमगाव वाघा येथे रामकथेचा भक्तिमय समारोप



अहिल्यानगर - नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेचा नुकताच अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात समारोप झाला. सलग नऊ दिवस गावात श्रीराम नामाचा गजर घुमत होता. श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रामकथेला ग्रामस्थ आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गावातील श्री नवनाथ मंदिर परिसरात हा धार्मिक सोहळा रंगला होता. ह.भ.प. रामायणाचार्य संतोष महाराज कौठाळे (देवदैठण) यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून रामायणातील विविध प्रसंगांचे प्रभावी निरूपण करत भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, सत्य, कर्तव्य, त्याग, भक्ती आणि धर्म यांचे महत्त्व त्यांनी आपल्या प्रवचनातून विशद केले. रामायण हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवनाला योग्य दिशा देणारे संस्कारमूल्यांचे दीपस्तंभ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.रामकथेच्या प्रारंभी सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी संतोष महाराज कौठाळे यांचे स्वागत केले. यावेळी कथेचे आयोजक ह.भ.प. विठ्ठल महाराज फलके, नामदेव फलके, दत्तात्रय फलके, चंद्रकांत जाधव, पोपट भगत, अतुल फलके, छगन भगत, अशोक फलके, भाऊसाहेब ठाणगे, अरुण कापसे, किरण जाधव, सागर कापसे, बबन जाधव, जयराम जाधव यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या रामकथेचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांनी साकारलेले रामायणातील विविध जिवंत प्रसंग होते. बालकलाकारांनी प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, हनुमान, रावण आदी पात्रांचे

रक्ताला नसतो धर्म!

# शिर्डीत बकरी ईदनिमित्त डॉ. कलाम संस्थेचा कौतुकास्पद उपक्रम




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** मुस्लिम धर्मियांचा पवित्र सण असलेल्या बकरी ईदचे औचित्य साधत शिर्डीमध्ये एक कौतुकास्पद आणि आदर्श उपक्रम राबवण्यात आला. शिर्डीतील प्रसिद्ध सामाजिक संघटना भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सेवाभावी संस्थेच्या वतीने, आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष महमूद सय्यद यांच्या विशेष पुढाकारातून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सणाच्या आनंदात समाजाप्रती आपले कर्तव्य बजावण्याच्या या उद्देशाला शिर्डीकरांनी भरभरून प्रतिसाद दिला.

या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे केवळ तरुणांनीच नव्हे, तर ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्वश्रेष्ठ दान समजले जाणारे रक्तदान केले. सणाच्या दिवशी रक्ताची नाती जोडणारा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला. या स्तुत्य उपक्रमाला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी शिबिरस्थळी भेट दिली.

यामध्ये शिर्डी नगरपरिषदेचे नगरसेवक निलेश कोते, पोपटराव शिंदे, नगरसेवक अमित दादा शेळके, आणि नगरसेवक अबरार शेख यांसह शिर्डीतील अनेक प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. उपस्थित सर्वच मान्यवरांनी महमूद सय्यद आणि त्यांच्या टीमच्या या सामाजिक बांधिलकीचे तोंडभरून कौतुक केले.

हे भव्य रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सेवाभावी संस्थेच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अहोरात्र कष्ट घेतले आणि हा उपक्रम यशस्वी करून दाखवला.

# एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्डने निलेश कन्स्ट्रोटेकचा सन्मान

### अमित बिहाणी यांचा बेस्ट आर्किटेक्ट पुरस्काराने सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) तर्फे आयोजित 'बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड' सोहळ्यात अहिल्यानगरमधील नामांकित निलेश कन्स्ट्रोटेक फर्मचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध विभागांमध्ये चार प्रतिष्ठित पुरस्कार पटकावत फर्मने उल्लेखनीय यश मिळवले असून, अमित बियाणी यांना 'बेस्ट आर्किटेक्ट' पुरस्काराने गौरविण्यात आले.

या सोहळ्यात हार्टबीट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल प्रोजेक्टला प्रथम क्रमांक, तर रामदेव रेसिडेन्सी स्कीमलाही प्रथम क्रमांक मिळाला. तसेच क्लाउड ९ रेसिडेन्शियल प्रोजेक्टला द्वितीय क्रमांक मिळाला. या उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे निलेश कन्स्ट्रोटेकला एकूण चार पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा पुणे विभागाचे नगररचना संचालक जितेंद्र भोपळे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी त्यांनी गुणवत्तापूर्ण बांधकाम क्षेत्रातील अशा उपक्रमांचे कौतुक करत उद्योगाला नवी दिशा देणारे असे उपक्रम असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास निलेश कन्स्ट्रोटेकचे संचालक एम. एम. बिहानी, शरद झंवर, निलेश बिहानी, दीपक नागोरी, अमित बिहानी तसेच एसा असोसिएशनचे अध्यक्ष अभिजीत देवी, उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, खजिनदार सुनील औटी, समन्वयक आदिनाथ दहिफळे, मनपा नगररचनाकार स्नेहल यादव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

निलेश कन्स्ट्रोटेक ही अहिल्यानगरमधील बांधकाम क्षेत्रातील प्रतिष्ठित संस्था असून गेल्या ५० वर्षापासून शहरात दर्जेदार प्रकल्प उभारण्याचे काम करत आहे. संस्थेने कोहिनूर शॉप, साईदीप हॉस्पिटल, रायसोनी कॉलेज, सातारकर लोटस हॉस्पिटल, रामकृष्ण शाळा तसेच क्लाउड ९ सारखे अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प उभे करून शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे.

# प्रभाग क्रमांक ८ पितळे कॉलनी रस्त्यावर पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांची गैरसोय

### नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्या तत्पर हस्तक्षेपाने तात्पुरता प्रश्न मार्गी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील पितळे कॉलनी परिसरात पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची समस्या पुन्हा एकदा निर्माण झाली असून नागरिकांना दळणवळणाचा गंभीर त्रास सहन करावा लागला. पहिल्याच पावसात रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने काही घरांमध्ये पाणी शिरल्याचेही प्रकार घडले, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

दरवर्षी पावसाळ्यात या भागात हीच परिस्थिती निर्माण होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची स्थिती निर्माण होते. यावर्षीही पावसाच्या सुरुवातीलाच पितळे कॉलनीतील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून 'डोह'सदृश परिस्थिती निर्माण झाली होती.

या प्रकाराची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि महापालिका प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या निर्देशानुसार महापालिका कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर साचलेले पाणी मशीनच्या सहाय्याने उपसून रस्ता वाहतुकीसाठी खुला केला.

नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्या तत्परतेमुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी हा प्रश्न दरवर्षी उद्भवत असल्याने यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. पावसाळ्यात होणारी ही गैरसोय थांबवण्यासाठी योग्य ड्रेनेज व्यवस्था आणि नियोजनबद्ध उपाययोजना करण्याची गरज स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

# दत्तात्रय आभाळे यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने गौरव

### शिक्षण व समाजसेवेतील योगदानाची दखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील शालेय शिक्षक दत्तात्रय पांडुरंग आभाळे यांना ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते आभाळे यांना पुरस्कार देण्यात आला.

या कार्यक्रमास रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सुशील सूर्यवंशी, नाशिक महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त नानासाहेब साळवे, राज्य प्रवक्ते डॉ. अविनाश शिंदे, नाशिक जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, माजी स्थायी समिती सभापती संजय साबळे, सुधीर उमराळकर, संजय दोफ्लदे, रील स्टार आसावरी बर्वे तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले, सचिव मिलिंद कळवणकर आदी मान्यवर उपस्थित होते. संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. आज शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ग्रामीण भागातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करून शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत.

शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही आभाळे यांचा सक्रिय सहभाग देत आहे. ग्रामीण युवकांमध्ये शिक्षणाबाबत जागृती निर्माण करणे, स्वच्छता अभियान राबविणे, पर्यावरण संवर्धन उपक्रमात सहभाग घेणे तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन अशा विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी देखील त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वत्र आभाळे यांचे अभिनंदन होत आहे.

# बकरी ईद पार्श्वभूमीवर शांतता, स्वच्छता आणि सुरक्षेची मागणी; गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याची शिफारस करा

### मुस्लिम समाज, शांतता समिती व आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** गुरुवारी (दि.२८ मे) रोजी साजरी होणाऱ्या बकरी ईद (ईद-उल-अजहा) सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी प्रशासनाने विशेष उपाययोजना कराव्यात, तसेच भारताच्या कृषीप्रधान संस्कृतीत गाईला असलेले महत्त्व लक्षात घेऊन तिला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याबाबत केंद्र सरकारकडे सकारात्मक शिफारस पाठवावी, अशी मागणी मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी, शांतता समितीचे सदस्य आणि आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

शहरात बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयोजित शांतता समितीच्या बैठकीदरम्यान मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांना निवेदन दिले. यावेळी आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, माजी नगरसेवक समद खान, मौलाना शफीक कासमी, सामाजिक कार्यकर्ते खालिद शेख, अकबर अली शेख, नईम सरदार, संजू जहागीरदार, मोहसिन शेख यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बकरी ईद सण शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावा, यासाठी मुस्लिम समाज प्रशासनाला पूर्ण सहकार्य करेल. मात्र सणाच्या काळात काही समाजकंटक सोशल मीडियावर खोट्या किंवा जुन्या पोस्ट व्हायरल करून वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्रामसह विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सायबर पोलिसांनी आधीपासूनच लक्ष ठेवून अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच कायदेशीर पद्धतीने मटणाची वाहतूक किंवा वाटप करणाऱ्या नागरिकांना केवळ संशयाच्या आधारावर अडवून कायदा हातात घेणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या समाजकंटकांवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. मुख्य नमाजच्या वेळी शहरातील ईदगाह आणि प्रमुख मशिदी परिसरात पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्याचे आवाहनही प्रशासनाला करण्यात आले आहे.

आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांबाबतही निवेदनात विशेष मुद्दे मांडण्यात आले. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा आणि अवशेष तात्काळ उचलण्यासाठी महानगरपालिकेने विशेष पथके व घंटागाड्या तैनात कराव्यात, तसेच दुर्गंधी टाळण्यासाठी जंतुनाशक फवारणी युद्धपातळीवर करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. सणाच्या काळात संबंधित भागात अखंडित पाणीपुरवठा आणि वीजपुरवठा सुरळीत राहावा, यासाठीही प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निवेदनात नमूद आहे.

मुस्लिम समाजाच्या वतीने प्रशासनाला हेही आश्वासन देण्यात आले की, मशिदींमधून नागरिकांना नियमांचे पालन, स्वच्छता राखणे आणि शांतता टिकवून ठेवण्याचे आवाहन करण्यात येईल. प्रशासनाने अधिकृत अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक आणि कचरा व्यवस्थापनाबाबत पूर्वनियोजन केल्यास समाजाकडूनही पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे शिष्टमंडळाने स्पष्ट केले.

# चनकवाडी शिवारात अवैध वाळू वाहतूक ३०.२५ लाखांचा हायवा व वाळू जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील चनकवाडी शिवारातील बंधारा परिसरात अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या हायव्यावर पैठण पोलिसांनी कारवाई करत तब्बल ३० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ मे २०२६ रोजी रात्री ८.४० वाजण्याच्या सुमारास चनकवाडी शिवारातील बंधारा परिसरात ही कारवाई करण्यात आली. आरोपी मोहम्मद मोईनोद्दीन शेख (वय ३१) व कय्युम खुदूस खतिब (रा. सादतमोहल्ला, पैठण) यांच्याविरुद्ध गुरनं १७२/२०२६ अन्वये कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी टाटा कंपनीचा २५१८ हायवा (क्र. -४६- -५२९७) ताब्यात घेतला असून त्याची किंमत अंदाजे ३० लाख रुपये आहे. तसेच हायवामध्ये भरलेली पाच ब्रास वाळू, अंदाजे २५ हजार रुपये किमतीची वाळू जप्त करण्यात आली. असा एकूण ३० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोहेका माळी यांनी दाखल केली असून पुढील तपास पोउपनि यादव करीत आहेत. आरोपींनी विनापरवाना बेकायदेशीररीत्या वाळूची वाहतूक केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### शहर स्थापनेदिनानिमित्त पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना भुईकोट किल्ल्याची फोटो फ्रेम भेट



**अहिल्यानगर - सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेल्या अहिल्यानगर शहराचा ५३७ वा स्थापना दिन गुरुवारी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना अहिल्यानगरच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्याची आकर्षक फोटो फ्रेम भेट देण्यात आली. स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते ही भेट देण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. स्नेहबंधच्या वतीने शहर स्थापनेदिनानिमित्त गेल्या ११ वर्षांपासून विविध सरकारी कार्यालये, अधिकारी तसेच सामाजिक संस्थांना भुईकोट किल्ल्याची फोटो फ्रेम भेट देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी बोलताना डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ‘‘अहिल्यानगर शहराला समृद्ध इतिहास, सांस्कृतिक परंपरा आणि वैभवशाली वारसा लाभलेला आहे. शहरातील ऐतिहासिक वास्तू आणि सांस्कृतिक ओळख जपणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. नवीन पिढीला शहराच्या इतिहासाची माहिती व्हावी आणि शहराच्या वारशाबद्दल अभिमान निर्माण व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे.’’ तसेच, ‘‘अहिल्यानगर शहराला पूर्वीचे वैभव प्राप्त व्हावे, शहरातील ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन व्हावे आणि शहर विकासाच्या नव्या उंचीवर जावे, अशी अपेक्षा आहे,’’ असेही डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले.**

### ‘चाहूल मातृत्वाची’ कार्यक्रमाचे आयोजन ३० मे रोजी




**अहिल्यानगर - मातृत्वाचा सुंदर प्रवास अधिक आनंददायी आणि जागरूक करण्याच्या उद्देशाने ‘‘चाहूल मातृत्वाची’’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ‘‘आई होणं म्हणजे नव्याने जन्म घेणं’’ या भावनिक संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम गर्भवती महिला, त्यांचे कुटुंबीय तसेच पालकत्वाचा विचार करणाऱ्या जोडप्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.हा कार्यक्रम शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता ऊर्जा रंगमंच, केडगाव, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमामध्ये मातृत्व या विषयावर प्रसिद्ध व्याख्याते संजय कळमकर हे विशेष मार्गदर्शन करण्यात येणार असून, उपस्थितांना मातृत्वाचा उत्सव आनंदाने साजरा करण्याची संधी मिळणार आहे.कार्यक्रमाचे आयोजन नगर बदलतय आणि ‘‘अभिप्रिया फोटोज’’ तर्फे करण्यात आले असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ डॉक्टर तसेच समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित राहणार आहे .अधिक माहितीसाठी ८१४९८१५८१५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**



मा ना श्री नितीनजी गडकरी यांच्या वाढदिवसाच्या निमित्त नागपूर येथे सत्कार करतांना अभय अगरकर वसंत लोढा सचिन पारखी जालिंदर वाकचोरे पंडीत वाघमारे आचार्य सर.

# केडगावच्या शाही जामा मस्जिदमध्ये बकरी ईद उत्साहात साजरी

**मुस्लिम बांधवांनी अदा केली ईदची नमाज; शांतता, बंधुता आणि सौहार्दाचा संदेश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथील शाही जामा मस्जिदमध्ये बकरी ईद (ईद–उल–अजहा) मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. ईदनिमित्त विशेष नमाज पठण करण्यात आले. नमाजानंतर देशात शांतता, सामाजिक ऐक्य, बंधुभाव तसेच सर्वांच्या सुख–समृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

मौलाना यांनी ईद–उल–अजहाचे धार्मिक महत्त्व सांगताना त्याग, मानवता आणि सेवाभावाचा संदेश दिला. समाजात प्रेम, सलोखा आणि परस्पर सहकार्य टिकवून ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुलांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण दिसून . परिसरात स्वच्छता व शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. ईदनिमित्त विविध ठिकाणी गोरगरिबांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली.

यावेळी केडगाव परिसरातील नागरिक, ज्येष्ठ मंडळी, युवक तसेच मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# महागाईच्या संकटात जनतेला दिलासा द्या

**पेट्रोल–डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करा । खासदार नीलेश लंके यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** देशभरात वाढत चाललेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल–डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी राज्य सरकारकडे आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र शासनाने पेट्रोल–डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज तात्काळ रद्द करावा, अशी मागणी खासदार लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

खासदार लंके यांनी पत्रात म्हटले आहे की, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला असून, त्याचा परिणाम थेट सर्वसामान्य जनतेवर होत आहे. खाद्यतेल, भाजीपाला, धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यातच पेट्रोल–डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून महागाई आणखी तीव्र होत आहे.

केंद्र सरकारकडून सातत्याने पेट्रोल–डिझेलच्या किमती वाढवल्या जात असून, मागील दहा दिवसांत सलग चौथ्यांदा दरवाढ करण्यात आली आहे. पेट्रोलमध्ये २ रुपये ६१ पैसे, तर डिझेलमध्ये २ रुपये ७१ पैशांनी वाढ झाली असल्याचे खासदार लंके यांनी नमूद केले आहे.

सध्या मुंबईमध्ये पेट्रोल १११.१२ रुपये प्रति लिटर, तर डिझेल ९६.८६ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध असल्याने सामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्य सरकार पेट्रोलवर सुमारे २५ टक्के व्हॅट आणि १०.१२ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारत असल्याचे, तर डिझेलवर सुमारे २४ टक्के व्हॅट आणि ३ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारला जात असल्याचे लंके यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. हे कर आणि अधिभार रद्द करण्यात आल्यास पेट्रोल–डिझेलचे दर थेट ७० ते ८० रुपयांपर्यंत खाली येऊ शकतात, असा दावा त्यांनी केला आहे. महागाईमुळे शेतकरी, कामगार, छोटे व्यावसायिक, वाहनधारक आणि मध्यमवर्गीय कुटुंबे मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने संवेदनशीलता दाखवत नागरिकांना तातडीने दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे.

राज्य सरकारने पेट्रोल–डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करून सामान्य जनतेच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील नोंदणीकृत न्यासांमधील प्राचीन हस्तलिखिते व ग्रंथांचे होणार डिजिटायझेशन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय ज्ञान परंपरेचा प्राचीन आणि समृद्ध वारसा जतन करण्यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालया अंतर्गत ज्ञान भारतम् हा विशेष प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त संस्थानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले जुने ग्रंथ, हस्तलिखिते आणि शिलालेख यांचे सर्वेक्षण, संवर्धन व डिजिटायझेशन करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्ह्याचे धर्मादाय उपआयुक्त श्री. न. वा. जगताप यांनी जाहीर प्रकटनाद्वारे केले आहे.

भारत सरकारच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे मंदिरांमध्ये, मठांमध्ये किंवा जुन्या संस्थांकडे असणारा ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा डिजिटल स्वरूपात सुरक्षित केला जाणार आहे.

ॲपवर करता येणार अपलोड

ज्या नोंदणीकृत न्यासांकडे (ट्रस्ट) जुनी हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेख किंवा ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध आहेत, त्यांनी त्याची माहिती व फोटो केंद्र सरकारने तयार केलेल्या या अधिकृत मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड करायचे आहेत.

या राष्ट्रीय कार्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील जास्तीत जास्त न्यासांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. आपल्याकडील प्राचीन ठेव्याची माहिती डिजिटल प्रणालीवर नोंदवून हा संवर्धन प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, अशी विनंती सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

# वारकरी संगीत भूषण पुरस्कारप्राप्त जगन्नाथ बोठे पाटील यांचे निधन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील वाळकी गावचे ज्येष्ठ नागरिक, प्रगतीशील शेतकरी व भागवत धर्माचे निष्ठावंत प्रसारक जगन्नाथ दगडुजी बोठे पाटील (वय ९०) यांचे शनिवारी ( ता. २३) वाळकी येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

कै. जगन्नाथ बोठे पाटील यांचे पंचक्रोशीतील सामाजिक व धार्मिक कार्यात मोठे योगदान होते. ते स्वत: जुन्या काळातील म्हणजे १९६६ च्या सुमारास संगीत विशारद हा संगीत क्षेत्रातील मानाची पदवी प्राप्त केलेले वाळकी व परिसरातील एकमेव व्यक्तिमत्व होते. संगीत कलेचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने झपाटलेल्या जगन्नाथ बोठे पाटील यांनी पंचक्रोशीतील हौशी तरुणांना टाळ, होर्मे नियम, तबला, पायपेटी व मृदंग वाजविण्यासह शास्त्रीय संगीत व भजनकला मोफत शिकविण्याची मोहीम पन्नास वर्षे राबविली. संगीत क्षेत्रातील या योगदानाबद्दल त्यांना सन २०१४ मध्ये पुण्यात शनिवारवाडा पटांगणात पंडित यादवराज फड यांच्या विशेष पुढाकाराने पार पडलेल्या नवव्या अखिल भारतीय वारकरी संगीत संमेलनात वारकरी संगीत भूषण या राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने गौरविण्यात आले. आपल्या आयुष्यात शेती क्षेत्रात विविध प्रयोग करत एक प्रगतीशील शेतकरी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला होता. शेतीसोबतच त्यांचा अध्यात्माकडे मोठा ओढा होता. भागवत धर्माचे पाईक म्हणून त्यांनी आयुष्यभर वारकरी संप्रदायाचा आणि भागवत धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मोठे योगदान दिले. आपल्या साध्या, सरळ आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी समाजात एक वेगळे आदरयुक्त स्थान निर्माण केले होते. वाळकी व परिसरात ते जगन्नाथतात्या या नावाने परिचित होते. राजकारणापासून ते नेहमीच जाणीवपूर्वक अलिप्त राहिले. जगन्नाथ बोठे यांच्या पार्थिवावर शनिवारी (ता. २३) वाळकी येथील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. त्यांच्या निधनाने वाळकी परिसरासह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या मागे दोन मुलगे, एक मुलगी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै. जगन्नाथ बोठे हे महाष्ट्रातील वरिष्ठ पत्रकार ॲड. डॉ. बाळासाहेब बोठे पाटील, वाळकी येथील यशदीप गॅस एजन्सीचे संचालक प्रा. अनुपम बोठे पाटील आणि वीरपत्नी इंद्रायणी भालसिंग यांचे वडील होत.



# विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय

( महाराष्ट्र सहकारी. संस्था अधिनियम १९६० व नियम१९६१ चे नियम अन्वये )

**द्वारा- गोरेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, गोरेगाव**

**ता.पारनेर, जि.अ. नगर मो.९०७५०३७१६१**

जा. क्र : १४४ /गोरेश्वर ग्रा. पत.गोरेगाव / ताबा नोटीस./सन २०२६ दिनांक- २८/०५ /२०२६

**नमुना झेड**

**स्थावर मालमत्ता ताब्यात घेण्याबाबतची नोटीस**

( नियम १०७ पोटनियम [ ११ (ड-१) ] पहा )

ज्या अर्थी , गोरेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित गोरेगाव ता. पारनेर जि. अहिल्यानगर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या कर्जदार / सहकर्जदार /जामीनदार यांचे विरुद्ध सक्तीच्या मार्गाने कर्ज वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये हुकूमनामा मिळविला आहे. ऋणको यांचे विरुद्ध मिळालेली वसुली दाखल्याअन्वये त्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी संस्थेचे वसुली अधिकारी हे करीत आहे.ऋणको अथवा थकबाकीदार कर्जदार /सहकर्जदार /जामीनदार यांची जप्त केलेली निम्नलिखित स्थावर मालमत्ता विक्री करून कर्ज वसूल करावयाचे आहे. ज्या अर्थी, खाली सही करणार वसुली व विक्री अधिकारी यांनी ऋणको कर्जदार/ सहकर्जदार/ जामीनदार यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम१९६१ चे कलम१५६ व नियम १०७ (११ ( ड १ ) नुसार ) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दिनांक - ०६/०३/२०२६ रोजी कागदोपत्री ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना सावध करण्यात येते कि, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास ऋणको कर्जदार / सहकर्जदार / जामीनदार यांचे वसुली दाखल्यावरील बोजाची रक्कम कर्ज वसूल होईपर्यंत होणारे व्याज व इतर आदेशिका खर्चासह अशा एकूण रकमेस अधीन राहावे लागेल.

संबधित ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ. नं. | कर्जदाराचे/जामीनदार नाव व पत्ता | गावाचे नाव | गट नं. | क्षेत्र हे. | क्षेत्र आर | वसुली दाखला व रक्कम | म.स.सं .अधि.१९६० मधील कलम १५६ नियम १०७ नुसार कारवाई |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १.कर्जदार – श्री.सोमनाथ रमेश दिघे यांचे कर्जाकरिता | वडझिरे ता.पारनेर | ----- | --- | --- | दाखला क्र. ८५३/२०२३ दि.१८/०३/२०२४ रु.१२,६३,४७७ /- व दि. ३०/०६/२०२३ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज व इतर खर्च | १ ) मागणी नोटीस दि. २६/०३/२०२४ २) जप्ती पूर्वीची नोटीस दि.२०/०१/२०२५ ३)स्थावर जप्ती आदेश दि. ०५/०३/२०२५ |
| | १. जामीनदार श्री .रमेश देवराम दिघे ता. पारनेर जि.अ. नगर | वडझिरे ता.पारनेर | ११३८<br>२२८९<br>२२९०<br>२२९५<br>२२९५<br>५६१<br>६१० | १<br>०<br>०<br>०<br>०<br>०<br>१ | ००<br>०७<br>०८<br>२१<br>११<br>६३<br>४२ | | |
| | २.जामीनदार-सुनिल बाळू मोरे मु.पो. वडझिरे ता. पारनेर जि.अ. नगर | वडझिरे ता.पारनेर | २६४४ | ० | २८ | | |
| २ | १.कर्जदार- सौ .मनिषा अंकुश फटांगरे यांचे कर्जाकरिता | मांडवे खुर्द ता.पारनेर | --- | -- | --- | दाखला क्र. २२५४/२०२४ दि.२९/०७/२०२४ रु.२९,४३,९२९ /- व दि. ३१/०३/२०२४ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज व इतर खर्च | १ ) मागणी नोटीस दि. ०५/०८/२०२४ २) जप्ती पूर्वीची नोटीस दि.२२/०१/२०२५ ३)स्थावर जप्ती आदेश दि. ०५/०३/२०२५ |
| | १.जामीनदार - श्रीमती. सुगंधाबाई लक्ष्मण फटांगरे मु.पो. मांडवे खुर्द ता.पारनेर जि. अ.नगर | मांडवे खुर्द ता.पारनेर | ३८४<br>३६१<br>२१२ | ०<br>०<br>० | ४७<br>१४.३३<br>२६ | | |
| | | खडकवाडी ता.पारनेर | २५९ | ० | ५२.३३ | | |
| | २.जामीनदार - प्रकाश रावसाहेब चाहेर मु.पो.वाळवणे ता.पारनेर जि.अ. नगर | वाळवणे ता.पारनेर | ७०५<br>५४९ | ०<br>० | ८.३३<br>१.५ | | |
| | जामीनदार नं.३ . बाबाजी तुकाराम तरडे मु.पो. यादववाडी ता.पारनेर जि.अ. नगर | यादववाडी ता.पारनेर | ४०३<br>४२५<br>४१२ | ०<br>०<br>० | ४.५०<br>०५<br>०२ | | |

दिनांक:-२८/०५ /२०२६
ठिकाण :- गोरेगाव

( श्री.खरमाळे एम के.)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
( महाराष्ट्र सह.संस्था, अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये )
गोरेश्वर ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या. गोरगाव
ता. पारनेर, जि. अहिल्यानगर

# महिन्यातून एकदा होणार आरोग्य विभागाचा आढावा; हाय रिस्क माता शोधा, बालमृत्यूचे प्रमाण कमी करा - डॉ. कपिल आहेर

**नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांची अहिल्यानगर मनपा आरोग्य विभागाची आढावा बैठक**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''अहिल्यानगर आपला दवाखाना'' हा राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम असून प्रत्येक नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी ही आरोग्य विभागाने गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचल्या पाहिजेत. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये दररोज किमान १०० ते १५० रुग्णांची ओपीडी होणे गरजेचे असून नागरिकांना मोफत औषधोपचार सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये जाऊन आरोग्य सुविधांबाबत जनजागृती करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल यांच्यासह डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कपिल आहेर म्हणाले की, जन्मलेल्या प्रत्येक बालकाच्या लसीकरणाबाबत विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांमध्ये जन्मलेल्या बालकांना तातडीने झिरो डोस देण्यात यावा, जेणेकरून कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही. तसेच आरोग्य केंद्रामार्फत हाय रिस्क मातांचा शोध घेऊन त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करून योग्य उपचार करण्यात यावेत.

बालक जन्मल्यानंतर घरी गेल्यावर त्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत आशा सेविकांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. आशा सेविका या आरोग्य विभागातील महत्त्वाचा दुवा असून त्यांच्यामार्फत आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचू शकतात. जन्मलेल्या बालकांची योग्य पद्धतीने काळजी घेतल्यास बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

मुलींना देण्यात येणाऱ्या कॅन्सर प्रतिबंधक लसीकरणाबाबत पालकांमध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता असून लसीकरण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना राबवाव्यात. ओपीडीमध्ये लहान मुलांची तपासणी करताना त्यांच्या शरीराची योग्य पद्धतीने पाहणी करावी. अंगावर फिवर रॅश किंवा इतर लक्षणे आहेत का, हे तपासून त्यानुसार उपचार करण्यात यावेत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

डॉ. आहेर पुढे म्हणाले की, ''मी आता दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात स्वतः येथे येऊन आढावा बैठक घेणार आहे. फक्त बैठक न घेता प्रत्यक्ष आरोग्य केंद्रांची पाहणी करून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची माहिती घेणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाचे काम समाधानकारक असल्याचे सांगत त्यांनी भविष्यात आणखी चांगल्या पद्धतीने आरोग्य सेवा देण्याचे आवाहन केले. तसेच ''टीबी मुक्त भारत'' अभियान सुरू असून अहिल्यानगर शहर टीबीमुक्त करण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर म्हणाले की, नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांनी आरोग्य विभागाच्या बैठकीत विविध आरोग्यविषयक उपक्रमांबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. महानगरपालिका नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असून आरोग्य सेवा घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी आशा सेविकांची मदत घेतली जाणार आहे. त्यांच्यासाठी विशेष कार्यशाळा घेऊन आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल व त्यानुसार आरोग्य सुविधा प्रभावीपणे राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# बकरी ईदच्या दिवशी मुस्लिम समाजाचा गोसंरक्षणासाठी पुढाकार

**मुस्लिम युवकांकडून गोशाळेत चारा वाटप; धार्मिक सौहार्दाचा अनोखा संदेश**

**गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याची मागणी; ''द्वेष नव्हे, एकात्मतेची गरज'' असल्याचा संदेश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बकरी ईद (ईद-उल-अजहा) या पवित्र सणानिमित्त शहरात धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा अनोखा संदेश देणारा उपक्रम गुरुवारी (दि. २८ मे) पार पडला. मुस्लिम समाजातील युवकांनी ईदच्या नमाजनंतर थेट गोशाळेत जाऊन गाईंना चारा वाटप करत समाजासमोर बंधुभावाचे एक वेगळे उदाहरण उभे केले. या उपक्रमामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, ''धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते,'' हा संदेश देण्यात आला.

कुष्ठधाम रोड, बारस्कर मळा येथील सतनाम साक्षी गोशाळेत आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ईदच्या आनंदात सहभागी होत मुस्लिम युवकांनी गोमातेला चारा अर्पण करून धार्मिक एकात्मतेची भावना जपली. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद यांच्यासह गोशाळेचे सचिव सीए शंकर अंदानी, मुकेश माधवाणी आणि अनेक युवक उपस्थित होते.

ईदसारख्या धार्मिक सणाच्या दिवशी मुस्लिम समाजातील युवक गोशाळेत चारा घेऊन पोहोचल्याने उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. समाजात अनेकदा अफवा आणि गैरसमजांच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना, या उपक्रमाने मात्र हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत उदाहरण समोर आणले. भारत हा कृषीप्रधान देश असून गाईला येथे विशेष धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्यात यावे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने नुकतीच जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीला अधिक बळ देण्यासाठी ईदच्या दिवशी गोशाळेत चारा वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना साहेबान जहागीरदार म्हणाले की, ''राज्य सरकारने लागू केलेल्या गोहत्या बंदीच्या नियमांचे पालन मुस्लिम समाज पूर्ण जबाबदारीने करत आहे. संपूर्ण देशभरात मुस्लिम समाजाने गावंश जनावरांची कुर्बानी केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. गाय ही हिंदू बांधवांच्या श्रद्धेचा विषय असून कृषी संस्कृतीचेही प्रतीक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याचा गंभीरपणे विचार करावा.''

ते पुढे म्हणाले की, ''गोहत्या किंवा गाईच्या नावावरून मुस्लिम समाजाविषयी चुकीचे समज निर्माण करण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. अफवा पसरवून दोन समाजांमध्ये द्वेष निर्माण करण्यापेक्षा एकात्मता, प्रेम आणि परस्पर आदर वाढविण्यासाठी समाजाने पुढे येण्याची गरज आहे. हिंदू-मुस्लिम समाज एकत्र राहिला तरच देश अधिक मजबूत होईल.''

मौलाना शफिक कासमी यांनीही ईदच्या दिवशी पार पडलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इस्लाम धर्म मानवतेचा, दयाळूपणाचा आणि सहअस्तित्वाचा संदेश देतो. समाजात शांतता आणि बंधुभाव टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे शहरात धार्मिक सलोखा आणि सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश पोहोचला असून, अनेक नागरिकांनी या पुढाकाराचे स्वागत केले आहे.

**नगर शहराचा ५३६ वा स्थापना दिवस साजरा**

# ऐतिहासिक वारसा हेच नगरकरांचे वैभव - साहेबान जहागीरदार

**शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या कबरीवर चादर अर्पण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) शहराचा ५३६ वा स्थापना दिवस गुरुवारी (दि. २८ मे) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने चादर अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराच्या ऐतिहासिक वैभवाची आठवण करून देत नगरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेला उजाळा देण्यात आला.

या कार्यक्रमास आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद आदींसह मोठ्या संख्येने इतिहासप्रेमी व युवक उपस्थित होते. उपस्थितांनी शहराच्या स्थापनेचा इतिहास आणि नगरच्या वैभवशाली परंपरेबद्दल अभिमान व्यक्त केला.

साहेबान जहागीरदार म्हणाले की, शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे प्रत्येक नगरकरासाठी अभिमानाचे प्रतीक आहे. संस्थापक अहमद निजामशहा यांच्या दूरदृष्टीमुळे हे वैभवशाली शहर उभे राहिले. एकेकाळी कैरो आणि बगदादसारख्या ऐतिहासिक शहरांच्या तोडीचे महत्त्व आणि ओळख आपल्या शहराला होती. जगातील फार कमी शहरांचे स्थापना दिन निश्चित माहित आहेत आणि त्यापैकी एक शहर म्हणजे अहमदनगर होय. अहमद निजामशहा यांनी २८ मे १४९० रोजी या शहराची स्थापना केली होती, याचा नगरकरांना अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, त्या काळात उभारण्यात आलेली खापरी पाणी नळ योजना ही सर्वांसाठी आकर्षणाचा विषय होती. शहराचे नियोजन अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने करण्यात आले होते. नगरला समृद्ध इतिहास, वास्तूंचा ठेवा आणि उच्च प्रतिभावान व्यक्तींची परंपरा लाभली आहे. भविष्यात शहराला पुन्हा एकदा जुने वैभव प्राप्त व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

मौलाना शफिक कासमी यांनी देखील शहराच्या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा देताना नगरच्या ऐतिहासिक घटनांचा आढावा घेतला. शहराची सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक महत्त्व आणि सामाजिक एकात्मता जपण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या माध्यमातून शहराच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्यात आले. युवकांनी इतिहास जतन करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# 'भाजपचा कार्यकर्ता समाजसेवेतून आदर्श निर्माण करतो' – राधाकृष्ण विखे पाटील

**सुनिल सकट यांचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते सत्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सामाजिक, पर्यावरण आणि वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. दिल्ली येथील 'मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.

शिर्डी येथे आयोजित भाजपच्या प्रशिक्षण वर्गात हा सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमात विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सुनिल सकट यांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, मुकुल गंधे, ॲड. देवेंद्र बंब, सावेडी मंडलाध्यक्ष ॲड. कुणाल वाणे, अंशुमन वाणे आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भाजपचा सर्वसामान्य कार्यकर्ता समाजसेवेच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करीत असल्याचे सांगितले. सामाजिक बांधिलकी जपत राजकारणात कार्य करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. सुनिल सकट यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजकार्याचा ध्यास सोडला नाही, याचे विशेष कौतुक करत त्यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सुनिल सकट यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत. गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी मदतकार्य, पर्यावरण संवर्धन मोहिमा, सामाजिक जनजागृती, तसेच युवकांना प्रेरणा देणारे उपक्रम यांच्या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी छाप निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या प्रतिष्ठित 'साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्काराने' देखील करण्यात आला आहे.

सत्काराला उत्तर देताना सुनिल सकट म्हणाले की, ''समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्यासाठी काम करणे हीच माझी खरी प्रेरणा आहे.

(पान १ वरून)

## सरकारी मेडिकल कॉलेज कापूरवाडी येथे होणार

चालविण्यात येणार आहे. तसेच पुढील सात वर्षांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) मेडिकल कॉलेजकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या मेडिकल कॉलेजमुळे जिल्ह्यात तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढणार असून ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवरच आधुनिक उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई किंवा इतर शहरांकडे जाण्याची गरज कमी होणार आहे. जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारा हा ऐतिहासिक प्रकल्प ठरणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## पाथर्डी मनसेच्या पदाधिकारी नियुक्त्या जाहीर

जोमाने काम करा जिथे मदत लागेल तिथे जिल्हाध्यक्ष व मी नेहमी आपल्या सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला पक्ष बांधणीसाठी लवकरच गाव तिथे शाखा उपक्रम राबवणार असल्याचेही तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी म्हटले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी राजसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे काम जोमाने करणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

या बैठकीस मनसे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, महिला सेना तालुकाध्यक्ष रेणुका फुलशेटे, शहराध्यक्ष संदीप काकडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण शिरसाट, अमोल नरोटे, अक्षय ऊराडे, तुषार शिरसाट, संजय बन, रशीद शेख, विकास डाळ, शंकर डोईफोडे, अनिल डोईफोडे, संदीप हंडाळ, मनोज ठोंबरे, निसार पठाण, विशाल भापकर, बंटी मोरे, प्रशांत भापकर, कानिफ हंडाळ, वैभव भापकर, सचिन पालवे, महेश ऊराडे, अंबादास शेळके, तोफिक मणियार, आलम पठाण, भाऊसाहेब बन, गणेश डोईफोडे, यांसह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक हजर होते.

## नगर-मनमाड रस्त्यावरील मसाज पार्लरवर छापा

बनावट ग्राहक तयार करून खात्री केल्यानंतर स्पा सेंटरवर छापा टाकण्यात आला. यावेळी महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बळजबरीने वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याचे पुढे आले. या प्रकरणी स्पा सेंटरचा व्यवस्थापक अनिकेत अशोक बचाटे याच्यासह दोन ग्राहकांना अटक करण्यात आली असून, पोलिसांनी या ठिकाणाहून चार पीडित महिलांची सुटका केली आहे. या प्रकरणी महिला पोहेकॉ अर्चना रामभाऊ काळे (वय ४५ वर्षे, नेमणूक अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३(३), सह स्त्रिया व मुली यांचे अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५,७ ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उन्हाळ्यात बाहेर झोपलेल्या कुटूंबाच्या घरात चोरी मुद्देमाल लंपास

आहेत. दि. २६ मे २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास नेहमीप्रमाणे सर्वांनी जेवण करून घराला बाहेरून कडी लावली व पोर्चसमोरील अंगणात झोपले असतानाच अज्ञात चोरट्यांनी घरावर लक्ष ठेवून चोरीचा डाव साधला आहे.दि.२७ मे रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अनुराधा जाधव या घरातील कामासाठी उठल्या असता घरातील कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले व उचकापाचक झालेली दिसून आली. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी तातडीने कुटुंबीयांना माहिती दिली असता चोरी झाल्याचे उघड झाले.फिर्यादीनुसार, घरातून अंदाजे १५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने (चेन, रिंग, बाळी, नथ, मंगळसूत्र), १२ हजार रुपयांच्या चांदीच्या वस्तू (लक्ष्मी मूर्ती, कंबरेची साखळी, तोळबंधी, करंडा), व्हिवो कंपनीचे दोन मोबाईल फोन आणि २२ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ६० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून उन्हाळ्यात बाहेर झोपताना नागरिकांनी अधिक खबरदारी घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे. घरात मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवणे, रात्री घराची सुरक्षा तपासणे, शक्य असल्यास प्रकाश व्यवस्था व देखरेख ठेवणे आणि संशयास्पद हालचाली दिसल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देणे आवश्यक असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान त्याचबरोबर उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनानेही रात्रीच्या गस्तीच्या फेऱ्या वाढवणे, गावांमध्ये नियमित राउंड घेणे आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्या देवींच्या कर्तृत्वाचा, विकासाचा अंगीकार करून त्यांची गरिमा जपण्याची गरज

नदी किनारी सुशोभीकरण केल्यास नदीला तिचे पुनर्वैभव प्राप्त होऊन शहराच्या सौंदर्यात देखील भर पडून अहिल्या देवींचे नाव खऱ्या अर्थानं सार्थकी लागेल. आपल्या शहराची भौगोलिक दृष्ट्या वाढ होत असून उपनगरे विकसित होत आहेत. शहर,उपनगरातील ठिकाणी स्त्रियांसाठी स्वच्छतागृह असणे महत्वाचे असून नागरिकांची अनेक वर्षांची ही मागणी आहे.याकडे त्वरित लक्ष दिल्यास स्त्रियांचा हा प्रश्न मार्गी लागेल. सध्या शहरामध्ये मजबुत रस्त्यांची निर्मिती करीत असलेले लोकप्रिय मा.आमदार संग्राम भैय्या जगताप, महापालिकेचे आयुक्त श्री.यशवंतजी डांगे व महापालिका प्रशासनास नगरकर धन्यवाद देतील.

जिल्ह्याला नाव दिलं म्हणजे कायापालट झाला असे नव्हे तर पुण्यश्लोक अहिल्या देवींच्या जगमान्य कर्तृत्वाचा, विकासाभिमुख दृष्टीचा अंगीकार केला तरच त्यांच्या नावाला खरे अभिवादन ठरेल हे नाव सार्थ ठरेल असा विश्वास येलुलकर यांनी व्यक्त केला.

आपला जिल्हा सहकारातील आहे, मोठमोठी कर्तृत्ववान राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिमत्वे येथे होऊन गेली आहेत आपली परंपरा मोठी आहे. भारतातील सहकारातील पहिला साखर कारखाना निर्माण करीत पद्मश्री कै.विठ्ठलराव विखे पाटील यांनी इतिहास निर्माण केला आहे. ही परंपरा लक्षात घेऊन विकासाच्या ध्यासाने व अहिल्यादेवीच्या स्वप्नातील शहर साकार करायचे असेल तर नगरकर हे सहज करू शकतात. जिल्ह्याचे पालकमंत्री नर. डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून ऐतिहासिक भुईकोट किल्ला राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी प्रयत्न करावेत असेही येलुलकर म्हणाले

आज शहराच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देतांना त्यांनी या भावना व्यक्त केल्या.

## शहरात ''चंगेडिया आऊटडोअर''च्या फ्लेक्स होल्डिंगचा काळाबाजार?

आहे. ''शहरातील नियम धाब्यावर बसवून विनापरवाना फ्लेक्स उभारले जात असतील तर प्रशासन नेमकं काय करतंय?'' असा सवाल उपस्थित करत, पुढील आठ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास महानगरपालिका कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा परिषदेकडून देण्यात आला आहे.

या वेळी प्रदेशध्यक्ष नावेद शेख, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अल्ताब शेख, जिल्हाध्यक्ष अजीम शेख, शहराध्यक्ष अरुण कोंडगे, तनजीम खान, वसी शेख, सोनू शेख, मोईन खान, शरीफ सय्यद, जावेद राजे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.